**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२३/प्र.क्र.०६/एसएम-२ दिनांक:-१४ ऑक्टोबर, २०२४

# मान्यता पत्र

**प्रति,**

अध्यक्ष / सचिव,
**शलाका फाउंडेशन, उरूळी देवाची, ता. हवेली, जि.पुणे.**

**विषय-** महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

**शलाका फाउंडेशन, उरूळी देवाची, ता. हवेली, जि.पुणे संचलित द क्रिस्टोन अंकुरम स्कुल, मौजे उरूळी देवाची, ता. हवेली, जि. पुणे.**

**संदर्भ-** इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२३/प्र.क्र.०६/एसएम-२, दि.०३/०२/२०२३.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **शलाका फाउंडेशन, उरूळी देवाची, ता. हवेली, जि.पुणे संचलित द क्रिस्टोन अंकुरम स्कुल, क्र.३०७/५, ३०५/७, ३०८/२१ व ३०६, मौजे उरूळी देवाची, ता. हवेली, जि. पुणे या (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई)** ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून **शलाका फाउंडेशन, उरूळी देवाची, ता. हवेली, जि.पुणे संचलित द क्रिस्टोन अंकुरम स्कुल, क्र.३०७/५, ३०५/७, ३०८/२१ व ३०६, मौजे उरूळी देवाची, ता. हवेली, जि. पुणे या (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई)** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटी व शर्तींसह इरादा पत्र दिले होते. आता, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सदर नवीन शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तींस अधीन राहून देण्यात येत आहे:-

**३. अटी व शर्ती :-**

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

१३) शासन परिपत्रक दि.०२ जून, २०१८ अन्वये विद्यार्थी सुरक्षा संदर्भात दिलेल्या मार्गदर्शक सूचना व शासन निर्णय दि.२१ ऑगस्ट, २०२४ अन्वये विद्यार्थी/विद्यार्थीनींच्या सुरक्षाविषयक उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.

१७/१०/२४

(सि.सा.घोरपडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी -

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे,
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
७. निवडनस्ती एसएम-२/ (प्र.क्र.०६/२०२३)

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
Email ID :- sm2.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२३/प्र.क्र.०६/एसएम-२ दिनांक :- ०९ डिसेंबर, २०२४

## मान्यता पत्र (शुध्दीपत्रक)

प्रति,

अध्यक्ष / सचिव,

**शलाका फाउंडेशन, उरूळी देवाची, ता. हवेली, जि.पुणे.**

**विषय-** महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

**शलाका फाउंडेशन, उरूळी देवाची, ता. हवेली, जि.पुणे संचलित द किस्टोन अंकुरम स्कुल, मौजे उरूळी देवाची, ता. हवेली, जि. पुणे.**

संदर्भ- मान्यता पत्र क्रमांक एसएफएस-१०२३/प्र.क्र.०६/एसएम-२, दि.१४.१०.२०२४.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **शलाका फाउंडेशन, उरूळी देवाची, ता. हवेली, जि.पुणे संचलित द किस्टोन अंकुरम स्कुल, क्र.३०७/५, ३०५/७, ३०८/२१ व ३०६, मौजे उरूळी देवाची, ता. हवेली, जि. पुणे या (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई)** या शाळेला सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर संदर्भाधिन पत्रान्वये मान्यता पत्र देण्यात आले होते. सदर मान्यता पत्रामध्ये नमूद शाळेचे नाव "द क्रिस्टोन अंकुरम स्कुल" ऐवजी "द **किस्टोन** अंकुरम स्कुल" असे वाचावे.

(प्रमोद कदम)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत: -

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई,
३) संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) विभागीय शिक्षण उप संचालक, पुणे विभाग, पुणे.
६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
७) निवड नस्ती- (एसएम-२/०६/२०२३).